**उपसंचालक आरोग्य सेवा, ठाणे मंडळ, ठाणे**

**वैद्यकिय अधिकारी, गट-ब यांची कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१ (भाग-१) / सेवा-३, दि. ०३/१२/२०१८ व शासन निर्णय क्र. संआसे-२०२२/प्र.क्र.१९२/सेवा-१ (शिकाना), दि २७/१२/२०२२ तसेच शासन निर्णय क्र.मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१ (भाग-१) सेवा-३ दि.०७.०३.२०२४ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे आरोग्य सेवा, ठाणे परिमंडळांतर्गत पालघर जिल्हयातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रातील महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा, गट-ब यांची १२ पदे वैद्यकिय अधिकारी, गट-ब, बी.ए.एम.एस. (B.A.M.S.) म्हणून कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून भरावयाची आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | ठाणे | ०२ |
| २ | पालघर | १० |
| | एकुण | १२ |

१) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यासाठी किंवा सदर पदावर बी.ए.एम.एस. अर्हताधारक नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

२) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिनेकरीता असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकाऱ्याप्रमाणे म.ना.से. (रजा) नियम लागु राहणार नाही. तसेच ते विमा योजना भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतीही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. त्यांना वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

३) सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांना धारणाधिकार असणार नाही.

४) कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

५) केवळ तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा ज्येष्ठता व कोणत्याही प्रकारच्या सेवा विषयक बाबीसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.

६) निवड झालेल्या कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.

१) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर.

२) कामामध्ये निष्काळजीपणा.

३) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.

४) कामकाज अकार्यक्षम असणे. सेवेची कर्तव्य व जबाबदाऱ्या कटाक्षाने न पाळणे.

५) गैरवर्तन/गैरव्यावहार केल्याचे निदर्शनास येणे.

६) कार्यरत पदावर नियमित उमेदवार नियुक्ती झाल्यास.

७) अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

८) निवड झालेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांनी मुख्यालयात राहणे बंधनकारक असेल. तसेच त्यांचे बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य आहे.

७) खालील कारणास्तव कार्यमुक्त झालेल्या कंत्राटी उमेदवारांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.

१) कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता, गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैद्यकिय अधिकारी.

२) शिस्तभंग कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकिय अधिकारी.

३) अनधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतून काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकिय अधिकारी-

८) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असतांना गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

९) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवा काळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांनी १ महिन्याची नोटीस किंवा १ महिन्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

१०) कंत्राटी उमेदवारांना १ महिन्याची आगाऊ सुचना देऊन संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे मंडळ, ठाणे त्यांना कार्यमुक्त करु शकते.

११) शासन निर्णय क्रमांक संआसे-२०२२/प्र.क्र.१९२/सेवा-१ (शिकाना), दि. २७/१२/२०२२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे नमूद कंत्राटी वैद्यकिय अधिकाऱ्यांपैकी आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या बी.ए.एम.एस. पात्रताधारकांना दरमहा रु. ४५०००/- व इतर भागात काम करणाऱ्या बी.ए.एम. एस. (B.A.M.S.) अर्हताधारकांना रु.४००००/-इतके एकत्रित मानधन दिले जाईल, तसेच शासन निर्णयात उर्वरीत नमुद अटी व शर्ती बंधनकारक राहतील. वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा उपसंचालक आरोग्य सेवा, ठाणे मंडळ, ठाणे यांचेशी करावा लागेल.

१२) कंत्राटी स्वरुपात सेवा असल्याने संबंधित पदावर कायम करण्याचा अधिकार त्यांना सांगता येणार नाही, तसेच त्या अनुषंगाने कोणत्याही न्यायालयात जात येणार नाही. अशा आशयाचा करारनामा उपसंचालक आरोग्य सेवा, ठाणे मंडळ, ठाणे यांचेशी करावा लागेल.

१३) उमेदवारांनी मुलाखतीस येतांना सोबत बी. ए. एम. एस. पदवीच्या सर्व वर्षाचे गुणपत्रक व प्रमाणपत्र व पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र, एमसीआयएम नोंदणी व नुतणीकरण प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकीत प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादी सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

१४) सदर उमेदवारांची निवड ही प्राप्त गुणांच्या आधारे करण्यात येईल. पदव्युत्तर पदविका/पदवी असलेल्या उमेदवारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. परंतु पदव्युत्तर पदविका/पदवी असलेल्या उमेदवारांची संख्या अधिक असल्यास निवड करताना उमेदवारांच्या पदव्युत्तर पदविका/पदवीकरीता प्राप्त गुणांचा विचार करण्यात येईल. व त्यानंतर बी. ए. एम. एस. पदवीधारकांना प्राध्यान्य देण्यात येईल. व बी. ए. एम. एस. पदवी प्राप्त उमेदवारांची देखील निवड ही प्राप्त गुणांच्या आधारे करण्यात येईल.

१५) सदर रिक्त पदांची संख्या ही कमी अथवा जास्त होऊ शकते.

१६) सदर भरतीबाबत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हा निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

**शैक्षणिक अर्हता** - बी.ए.एम.एस.

**अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण व कालावधी**-ठाणे परिमंडळातील ज्या जिल्हयात अर्ज करावयाचे आहे त्या जिल्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (ठाणे जि-ठाणे, पालघर जि-पालघर) यांचे कार्यालयात दि.०७.०८.२०२६ पासुन ते दि.२१.०८.२०२६ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत पोस्टाने अथवा समक्ष स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**टिप** - पात्र उमेदवारांची यादी संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे/पालघर यांच्या कार्यालयाकडुन प्रसिध्द करण्यात येईल.

**सही/-**

**(डॉ. अशोक नादापुरकर)**

**उपसंचालक,**

**आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे.**

**विमाका/कोवि/२०२६-२०२७/७१**